# ‘दिबां’च्या नावासाठी... आता पेटवू सारे रान!

मंगळवार, २५ जानेवारी २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक १८९
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

येत्या काळात तब्बल एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरणार!

सर्वपक्षीय कृती समितीकडून सिडकोला एक महिन्याचा अल्टिमेटम




## आंदोलनाचा धसका घेऊन सिडकोने स्वत:हून केले विमानतळाचे काम बंद

**पनवेल : हरेश साठे**

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या नावासाठी काहीही झाले तरी चालेल अशी रोखठोक भूमिका कायम ठेवत व ‘जय दिबा’ असा जयघोष करीत सोमवारी (दि. २४) लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समिती यांच्या नेतृत्वाखाली हजारो प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या साक्षीने ओवळे फाटा येथे विमानतळ काम बंद लाक्षणिक आंदोलन करण्यात आले. आता पेटवू सारे रान असा एल्गार करीत भूमिपुत्रांनी सिडकोला त्यांच्या पापांचे प्रायश्चित करण्यासाठी एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. सिडको वठणीवर नाही आली, तर येत्या काळात तब्बल एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा या आंदोलनातून देण्यात आला आहे. (पान २ वर..)






(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

## ‘दिबां’च्या नावासाठी १०५ हुतात्मे द्यायला तयार -दशरथदादा पाटील

रायगडला लोकनेते दि. बा. पाटील नावाचे नेतृत्व, दैवत मिळाले आहे. भूमिपुत्रांचे हे आंदोलन दीर्घकाळ चालणार आहे आणि तशी तयारी भूमिपुत्रांनी ठेवली आहे. जोपर्यंत सरकारची सकारात्मक दृष्टी होत नाही तोपर्यंत आक्रमक पवित्रा असणार असून यापुढे तीव्र आणि आक्रमक आंदोलने असतील. भूमिपुत्र संतापलेला आहे. त्यामुळे सिडकोच्या अधिकाऱ्यांना बांगड्या भरायला कमी पडणार नाही. भूमिपुत्रांच्या बाबतीत सिडकोच्या एमडींकडे निर्णयक्षमता नसेल तर त्यांनी पद सोडावे, तसेच हे सरकार रक्तपिसासू असेल तर रक्त घ्या, पण ‘दिबां’चे नाव आणि प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या सरकारने पूर्ण कराव्यात. राजू शेट्टी, आमदार जयंत पाटील यांनीही ‘दिबां’च्या नावास पाठिंबा दिला आहे. ‘दिबां’च्या नावासाठी सर्व पक्षांतील नेत्यांनी राजकीय चपला बाजूला सारून सहभागी झाले पाहिजे, असे सांगून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील म्हणाले की, हे आंदोलन अनेक वर्ष चालेलही, पण भूमिपुत्र शांत राहणार नाही आणि भूमिपुत्र अशांत झाले, तर सरकार चालवणे कठीण होईल. संयुक्त महाराष्ट्रासाठी १०५ हुतात्मे झाले, तसे ‘दिबां’च्या नावासाठी १०५ हुतात्मे द्यायला तयार आहोत. पुढील २४ तारखेला पुन्हा आंदोलन करणार आहोत. त्याची रणनीती येत्या १० दिवसांत जाहीर करू आणि त्याच्या पुढची आंदोलने यशस्वी होईपर्यंत तीव्र, अतितीव्र स्वरूपात होतील. त्याचबरोबर येत्या काळात पाचही जिल्ह्यांतील एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरवणार आहोत, असेही त्यांनी जाहीर केले.

## ...तोपर्यंत लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल -लोकनेते रामशेठ ठाकूर

‘दिबा’साहेबांचे नाव आणि प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विमानतळाचे काम बंद पाडण्याची भूमिका घेऊन आपण सर्व आलो. सिडकोला माहीत होते काम बंद नाही केले, तर भूमिपुत्र आंदोलक आक्रमक होईल आणि तोच धसका घेऊन विमानतळाचे काम बंद केले. ज्या स्तरावर आंदोलन होईल त्या वेळेला पुढे जाण्यासाठी युवा आणि महिला सरसावले आहेत. सर्वपक्षीय कृती समिती आणि २७ गाव समिती ‘दिबा’साहेबांचे नाव, ७९ गाव तसेच ९५ गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करीत आहे. दुसरीकडे सर्व बाबतीत सिडको मात्र चालढकल करतेय. चार दिवसांपूर्वी सिडकोसोबत झालेल्या चार तासांच्या बैठकीत सिडकोचे अधिकारी चर्चेत फक्त वेळकाढूपणा करीत होते. किती दिवस चर्चा करायची. आता लढाई उत्तरोत्तर तीव्र करायची. कितीही आंदोलने करावी लागली तरी चालेल, पण सिडकोला स्वस्थ बसू द्यायचे नाही. सिडकोच्या कार्यालयात घुसण्याची तयारी करावी लागेल. हुतात्म्यांचे रक्त वाया जात नसते, वाया जाऊ द्यायचे नसते हे ‘दिबां’नी शिकवले आहे. जोपर्यंत ‘दिबां’चे नाव आणि भूमिपुत्रांचे प्रश्न सुटत नाही तोपर्यंत लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल, असे सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट केले.



### घोषणांनी आसमंत दणाणला

*प्रकल्पग्रस्तांच्या मागील आंदोलनांचा अनुभव घेत या आंदोलनावेळी हजारो पोलिसांचा फौजफाटा तैनात करावा लागला होता. वारकरी मंडळींनी टाळ-मृदंगाचा ठेका घेत ‘दिबां’चा जयजयकार केला, तसेच ‘दिबासाहेबांचा विजय असो’, ‘जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची’, ‘सिडको मुर्दाबाद’ अशा घोषणांनी भूमिपुत्रांनी आसमंत दणाणून सोडला. या आंदोलनाचा धसका घेऊन सिडकोने स्वतःहून विमानतळाचे काम बंद केले; अन्यथा विमानतळ क्षेत्रात घुसून काम बंद करण्याची तयारी या वेळी स्पष्टपणे दिसत होती, परंतु विमानतळाचे काम बंद आहे की नाही याची खात्री करण्यासाठी आमदार महेश बालदी, नंदराज मुंगाजी यांच्या नेतृत्वाखाली ५० भूमिपुत्रांनी विमानतळ कामाची पाहणी केली, तेव्हा काम बंद असल्याचे दिसून आले.*

**हा लढा फक्त २७ गावांचा राहिला नाही, तर संपूर्ण भूमिपुत्रांचा झाला आहे. एक दिवस लाक्षणिक आंदोलन झाले, पण पुढच्या वेळी आंदोलन तीव्र असेल. डिसेंबर २०२४मध्ये विमान उडेल असे सिडकोचे अधिकारी सांगतात, पण प्रकल्पग्रस्तांनी विमानतळाचे काम बंद पाडले, तर विमान कसे उडेल?**

**-जगन्नाथ पाटील**, माजी मंत्री,
सल्लागार, सर्वपक्षीय कृती समिती

**हिंमत होती तर आज विमानतळाचे काम करून दाखवले पाहिजे होते. प्रकल्पग्रस्तांची ताकद काय आहे ती दाखवून दिली असती. आजचा हा इशारा होता. पुढचे आंदोलन सिडकोला अधिक कठीण जाईल.**

**-नंदराज मुंगाजी**,
अध्यक्ष, २७ गाव समिती

## बाळासाहेबांच्या निर्णयावर तुम्ही बोट दाखवत आहात का? -फडणवीस


**मुंबई : प्रतिनिधी**



उद्धव ठाकरे यांनी २५ वर्ष युतीत सडलो असे वक्तव्य केले, पण २०१२पर्यंत या युतीचे नेते हे स्वतः वंदनीय बाळासाहेब ठाकरे होते. युतीचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्यांच्या हयातीत त्यांनी ही युती कायम ठेवली. याचा अर्थ बाळासाहेबांच्या निर्णयावर तुम्ही बोट दाखवत आहात का? भाजपसोबत शिवसेना सडत असताना बाळासाहेबांनी सडत ठेवले का? असा विचार आमच्या मनात येत आहे, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री व विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शरसंधान साधले आहे.

दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांशी रविवारी संवाद साधताना भाजपला लक्ष्य केले. या टीकेला विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २४) मुंबईत पत्रकार परिषदेत प्रत्युत्तर दिले. **(पान २ वर..)**

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांना कोरोनाची लागण



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांना कोरोनाची लागण झाली आहे. पवार यांनी ट्वीट करीत याविषयीची माहिती दिली. त्याचबरोबर संपर्कात आलेल्या सर्वांना खबरदारी घेण्याचे आणि चाचणी करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करून पवारांची चौकशी केली.



**पनवेल : देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला मिरच्यांची धुरी देऊन भाजप युवा मोर्चाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (वृत्त पान २ वर..)

कर्नाळा बँक कर्ज घोटाळा प्रकरण

## विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी १ फेब्रुवारीला

**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज घोटाळा प्रकरणामुळे अटकेत असलेले कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक शंकर पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी १ फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तळोजा तुरुंगातील मुक्काम आता आणखी नऊ दिवसांनी वाढला आहे.



विवेक पाटील यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) १५ जून २०२१ रोजी पनवेलमधील त्यांच्या राहत्या घरातून अटक केली होती. तेव्हापासून ते तुरुंगातच आहेत.

# नाना पटोलेंच्या प्रतिकात्मक पुतळ्याला पनवेलमध्ये भाजयुमोकडून मिरच्यांची धुरी

## माफी न मागितल्यास मंत्र्यांना घेराव घालू -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या चुकीच्या विधानाचा भाजपच्या पनवेल शहरातील मध्यवर्ती कार्यालयाजवळ भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने सोमवारी (दि. २४) जोरदार निषेध करण्यात आला. नाना पटोले यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला मिरच्यांची धुरी देण्यात आली. या वेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माफी मागितली नाही, तर रायगड जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी काँग्रेसचे मंत्री येतील तेथे त्यांना घेरावा घालू, असा इशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीचे विधान केल्यामुळे राज्यभरात त्यांचा निषेध होत आहे. पनवेल शहरातही भाजप युवा मोर्चाच्या वतीने नाना पटोले यांच्या पुतळ्याला मिरचीची धुरी देऊन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी नाना पटोले हाय हाय, अटक करा अटक करा नाना पटोलेंना अटक करा, अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, भाजप नेते जितेंद्र वाघमारे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष रोहित जगताप, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, पनवेल शहर सरचिटणीस गौरव कांडपिळे, अक्षय सिंग, शिवाजी भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चारित्र्यावर डाग लावण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेत्यांनी केला, तर त्यांना योग्य पद्धतीने उत्तर देण्यासाठी भारतीय जनता पक्ष समर्थ असल्याचे सांगितले.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रिन्सिपल डायरीचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. २४) प्रिन्सिपल डायरीचे प्रकाशन करण्यात आले. या डायरीत शाळेच्या सुरळीत कामकाजासाठी प्राचार्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती उपलब्ध आहे.

ललित कुमार शर्मा यांच्या प्रयत्नातून ही डायरी साकारण्यात आली आहे. प्रकाशनाच्या वेळी खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या राज अलोनी, ललित कुमार शर्मा आदी उपस्थित होते.

भारतात अशा प्रकारची प्रकाशित होणारी सीबीएसई शाळा ए विशेष पहिली डायरी आहे. या डायरीत शाळेच्या सुरळीत कामकाजासाठी सीबीएसई प्राचार्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती आहे आणि शाळेच्या तपासणीसाठी सर्व तपशील भरून तयार तक्ता बनवलेला आहे, जो आवश्यक असेल तेव्हा प्राचार्यांना शाळेबद्दल सर्व माहिती पुरवितो.

प्राचार्या राज अलोनी (राज्य पुरस्कारित) यांनी प्रिन्सिपल डायरी यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती संकलित केलेली आहे. अलोनी या प्राचार्यांच्या एक प्रशंसनीय व प्रख्यात प्रशिक्षक आहेत. त्यांनी खूप मेहनत घेऊन प्राचार्यांना त्यांच्या स्वप्नातील प्रकल्प त्यांना काय माहीत नाही हे जाणून घेण्यास सक्षम व प्रशिक्षित केलेले आहे. म्हणून शाळेच्या प्राचार्यांसाठी अशा प्रकारच्या पहिल्या ज्ञानकोशाचे प्रकाशन केले आहे.

ललित कुमार शर्मा यांनी ही विशेष प्रिन्सिपल डायरी छापली असून या डायरीला अंकित प्रिन्सिपल डायरी म्हणूनही ओळखले जाते. शर्मा हे भारतीय नौदलात कार्यरत होते.

पान १ वरून

## 'दिबां'च्या नावासाठी... आता पेटवू सारे रान!

रखरखत्या उन्हात या आंदोलनामध्ये लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, सल्लागार माजी मंत्री जगन्नाथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीता पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, कॉम्रेड भूषण पाटील, राजाराम पाटील, संतोष केणे, गुलाब वझे, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, समितीचे खजिनदार जे. डी. तांडेल, दशरथ भगत, दीपक म्हात्रे, रूपेश धुमाळ, प्रेम पाटील, राजेश गायकर, दीपक पाटील, उत्तम कोळी, सुनील पाटील, किसान सभेचे रामचंद्र म्हात्रे, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, अमर पाटील, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, प्रवीण पाटील, संतोष शेट्टी, विकास घरत, नगरसेविका दर्शना भोईर, चारुशीला घरत, सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, प्रमिला पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर, विजय घरत, गोवर्धन डाऊर, दगडू गायकवाड यांच्यासह युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी प्रमुख नेत्यांसह विक्रांत घरत, प्रेम पाटील, राजाराम पाटील, ह.भ.प. विठाबाई भोईर, जे. डी. तांडेल, गुलाब वझे, पंढरीनाथ पाटील, दगडू गायकवाड, निलेश तांडेल यांचीही भाषणे झाली.

### एके-५६वाल्यांनो हिंमत असेल, तर पहिली गोळी मला घाला -माजी उपमहापौर जगदिश गायकवाड

सिडकोने प्रकल्पग्रस्तांच्या विरोधात कट-कारस्थान केले आहे. विमान उडले नाही, तर प्रकल्पग्रस्तांना काहीही फरक पडणार नाही. प्रकल्पग्रस्त, पोलीस उन्हात आणि सिडकोचे अधिकारी वातानुकूलित कार्यालयात बसले आहेत. 'दिबां'च्या विचारांचे चिलखत आमच्याकडे आहे म्हणून एके-५६वाल्यांनो हिंमत असेल, तर पहिली गोळी मला घाला, असे आव्हान देत माजी उपमहापौर व रिपाइंचे कोकण अध्यक्ष जगदिश गायकवाड म्हणाले की, 'दिबां'चे नाव आणि योग्य पुनर्वसन अशा मागण्या आहेत त्या पूर्ण करा. पोलिसांना पुढे करायचे आणि आंदोलन चिरडायचे हा सिडकोचा धंदा आहे, पण आता माघार नाही. तर प्रकल्पग्रस्तांना सर्वपरीने न्याय मिळत नाही तोपर्यंत ही लढाई सुरूच राहील.

### हे घ्या रक्त, किती पाहिजे ते सांगा -दशरथ भगत

या वेळी सर्वपक्षीय कृती समितीचे कार्यकारिणी सदस्य व नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी आपल्या भाषणात, हे जनसरकार नाही, तर दंडसरकार आहे. पोलीस बांधव आपल्यासोबत आहेत, कारण त्यांना माहीत आहे की, सिडकोने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला आहे. १९८४च्या रक्तरंजीत लढाईतून सरकारने रक्त घेतले, पाच हुतात्मे झाले, असा घणाघाती हल्ला चढवत सरकारला रक्ताचा अभिषेक पाहिजे का? आम्ही देतो, पण 'दिबां'चे नाव विमानतळाला द्या, असे आवाहन करून स्वतःच्या हातावर वार करीत रक्त काढले आणि हे घ्या रक्त, किती पाहिजे ते सांगा अशी हाक देत गावागावांत रक्ताचा अभिषेक कार्यक्रम घेऊ. तुमच्याकडे गोळी, बंदुका, बॉम्ब आहे, पण आम्ही घाबरणार नाही, आम्हाला नक्षलवादी बनवायचे आहे का ते सांगा, अशी विचारणा केली.

### यापुढे बेमुदत काम बंद आंदोलन; सिडकोचा चक्का जाम करायचा -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या प्रश्नावर सिडकोने डोळे बंद केलेले आहेत. ते उघडण्यासाठी हे आंदोलन उभारले आहे. तळपत्या उन्हात ठाण मांडून भूमिपुत्र या आंदोलनात सहभागी झाले आहेत. 'दिबा'साहेबांनी संघर्षाचा मूलमंत्र दिला आहे, ही भूमी संघर्षाची भूमी आहे. प्रकल्पग्रस्तांचे हक्क संघर्षाशिवाय मिळत नाही आणि मिळाले नाहीत. सिडकोकडे एमडी, जॉइंट एमडी, आयएएस दर्जाचे अधिकारी आहेत, पण ते फक्त बैठका घेतात. निर्णय काही घेत नाहीत. हे अधिकारी दोन-तीन वर्षांसाठी येतात आणि नव्याने उजळणी करत बसतात. त्यांचा कार्यकाळ संपतो तोपर्यंत त्यांना प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाशी काही देणेघेणे नसते. त्या जागी पुन्हा दुसरे अधिकारी आले की पुन्हा सुरुवातीपासून उजळणी सुरू. असे ३० वर्षे सिडकोने वेळ मारूपणा केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला सिडकोचे अध्यक्ष केले. त्यानंतर प्राधान्याने मी प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय आणि भूमिका घेण्याचे अधिकाऱ्यांना वारंवार सांगत आलो. त्या अनुषंगाने निर्णय झाले. साधारण दीड वर्ष मी अध्यक्ष होतो. या काळात दोन निवडणुकांच्या आचारसंहिता लागल्या. वेळ कमी मिळाला, परंतु प्रकल्पग्रस्त स्थानिकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सकारात्मक कामे केली, मात्र आज पुन्हा येरे माझ्या मागल्या करीत कारभार करत आहे. सिडकोला वाटतंय कोविड बचावासाठी येईल, सिडको प्रकल्पग्रस्तांना गांभीर्याने घेत नाही. सिडकोकडे निर्णयक्षमता राहिली नाही. त्यामुळे आंदोलनाशिवाय पर्याय उरला नाही. 'दिबा'साहेबांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे यासाठी सर्व आंदोलनांत भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांचा मोठा वाटा आहे. काम बंद पाडणे आपले उद्दिष्ट नाही, तर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. सिडको आणि राज्य सरकार भूमिपुत्रांच्या बाबतीत गंभीर नाही हे प्रकर्षाने जाणवत आहे. आज एक दिवस लाक्षणिक आंदोलन केले, पण यापुढे बेमुदत काम बंद आंदोलन करावे लागेल आणि येत्या काळात सिडकोचा चक्का जाम करावाच लागेल, असा इशाराही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको व राज्य शासनाला दिला.

### लोकभावना लक्षात न घेता बाळासाहेबांच्या नावाचा ठराव -कॉम्रेड भूषण पाटील

आजचे लाक्षणिक काम बंद आंदोलन हा तीव्र लढाईचा इशारा आहे. जोपर्यंत 'दिबा'साहेबांचे विमानतळाला नाव लागत नाही तोपर्यंत थांबायचे नाही. लोकांच्या भावना लक्षात न घेता बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा ठराव केला, पण मागणी करूनही सिडको अद्यापदेखील ठराव भूमिपुत्रांकडे लेखी स्वरूपात का देत नाही? न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहणार, असे कॉम्रेड भूषण पाटील यांनी सांगितले.

## बाळासाहेबांच्या निर्णयावर तुम्ही बोट दाखवत आहात का? -फडणवीस

फडणवीस म्हणाले की, सोयीचा इतिहास आणि निवडक विसरणे या दोन गोष्टी प्रामुख्याने उद्धव ठाकरेंच्या भाषणात पाहायला मिळाल्या. भाजपसोबत सडले असे सांगतात, पण भाजपसोबत असताना शिवसेना पहिल्या क्रमांकाचा पक्ष होती आणि सोडल्यानंतर चौथ्या क्रमांकावर गेली. त्यामुळे कोणासोबत सडले याचाही निर्णय घेतला पाहिजे.


मुख्यमंत्र्यांच्या प्रत्येक भाषणात तेच मुद्दे आहेत. आता शिवसैनिकांनाही ते काय बोलणार आहेत हे पाठ झाले असेल. राम जन्मभूमीच्या आंदोलनात लाठ्या, काठ्या, गोळ्या खाणारे आम्ही आहोत. त्या वेळी तुम्ही तोंडातली वाफ दवडत होतात. राम मंदिर, बाबरी हे विषय सोडून द्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिर करून दाखवले, पण तुमचे मुख्यमंत्री होते तेव्हा आणि आताही कल्याण दुर्गाडीचा प्रश्न सोडवू शकले नाही. श्री मलंगगडाचा प्रश्न सोडवू शकले नाही. उस्मानाबादचे धाराशिव झाले नाही. हिंदुत्वाच्या कशाला गप्पा मारताय? भाषणाच्या पलीकडे तुमचे हिंदुत्व काय? हिंदुत्व जगावे लागते, ते फक्त भाषणापुरते मर्यादित नसते, अशी टीका फडणवीस यांनी केली.

आम्ही वंदनीय बाळासाहेब ठाकरेंना अभिमानाने अभिवादन करतो, मात्र बाळासाहेबांसाठी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधींकडून अभिवादन सोडा, साधे एक ट्वीट दाखवा. त्यांना ट्वीट करायलाही लाज वाटते. तरीदेखील सत्तेसाठी तुम्ही त्यांच्या मांडीला मांडी लावून बसता. यापेक्षा मोठी लाचारी काय?, असे टीकास्त्र विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सोडले.

बाबरी मशिदीनंतर संपूर्ण देशात शिवसेनेसाठी अनुकूल लाट होती. तेव्हा सीमोल्लंघन केले असते तर आज दिल्लीत शिवसेनेचा झेंडा असता, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. त्यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, १९९३च्या निवडणुकीत शिवसेनेने उत्तर प्रदेशात १८० उमेदवार लढवले होते. त्यातील १७९ लोकांचे डिपॉझिट जप्त झाले होते. १९९६मध्ये २४ उमेदवार लढले. त्यातील २३ जणांचे आणि २०१९मध्ये ३९ उमेदवार लढवले त्या सर्वांचे डिपॉझिट जप्त झाले. लोकांनी तुम्हाला नाकारले होते, कारण त्यांना रामजन्मभूमीच्या आंदोलनात कारसेवक आणि संघ विचाराचे लोक सक्रिय होते हे माहिती होते, असे फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्राची जी अवस्था आज होत आहे ती यापूर्वी कधी पाहिली नाही. इतके बेशिस्त आणि भ्रष्ट सरकार महाराष्ट्राने कधीच अनुभवले नाही. चौथ्या क्रमांकावर गेल्याची निराशा असू शकते, पण त्यांनी अशी काढू नये, असा चिमटा फडणवीसांनी काढला.

दरम्यान, शिवसेना खासदार संजय राऊत यांनी भाजपला आव्हान दिले असून नाय मातीत गाडले, लोळवले तर शिवसेना आपले नाव सांगणार नाही असे म्हटले आहे. त्यावर त्यांनी आताच नाव बदलावे, असा टोला फडणवीस यांनी लगावला.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. २५ जानेवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल २. क्रीडा संकुल, एचओसी, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. आंबेडकर भवन, पनवेल १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

**कोवॅक्सिन**

- १. काळभैरव कार्यालय, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ३. निमिष हेल्थ सेंटर, खारघर (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ४. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- आसुडगाव राजीप शाळा
- रोडपाली राजीप शाळा
- ओवे कॅम्प राजीप शाळा
- पापडीचा पाडा राजीप शाळा
- रांजणपाडा राजीप शाळा
- धरणा कॅम्प राजीप शाळा
- इनामपुरी राजीप शाळा
- पिसार्वे राजीप शाळा
- फरशीपाडा राजीप शाळा
- धामोळे राजीप शाळा



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender / RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-32/ **7000022029** | Work of anticorrosive painting of EHV line towers and EHV substation Gantry, support structure at 100kV Taloja, BOC, FGIL, Thal substations under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 99.98 Lakhs |
| Tend-30/ **7000021938** | Work of Supply & installation of 36KV Galvanized CT at various substation under EHV (O&M) Circle, Panvel (1st extn.) | Rs. 99.67 Lakhs |
| Tend-27/ **7000021864** | Work of Supply & installation of EHV transformer cooling Fan at various substation under EHV (O&M) Circle, Panvel (1st extn.) | Rs. 10.99 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST. **Submission of bids from 25.01.2022 to 02.02.2022 up to 23:59 hrs., Opening date :- 03.02.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)
Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141
E-mail ID **se7200@mahatransco.in**

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**राव साहेब**
**अर्जदारांचे वकील ॲड. नित्यानंद राम ठाकूर**
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**
**दिवाणी चौ. अर्ज १६२३/२०२१**
**नि. ८/ड**
**ने.ता. २३/०३/२०२२**

१. श्री. महेंद्र विश्वनाथ म्हात्रे
वय : ४८ वर्षे, व्यवसाय नोकरी,
मु. मोरावे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड
२. श्री. अंकुश विश्वनाथ म्हात्रे
वय : ४० वर्षे, व्यवसाय : व्यवसाय,
मु. मोरावे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड
३. श्री. ऋषिकेश विश्वनाथ म्हात्रे
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
मु. मोरावे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड
— **अर्जदार**

विरूद्ध

कोणीही नाही — **सामनेवाले**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, सदरहू अर्जदार वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल करत आहेत. अर्जदारांचे वडील **कै. विश्वनाथ काथोर म्हात्रे हे १३.०१.२०१३** रोजी मु. मोरावे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदारांच्या आई **कै. गंगाबाई विश्वनाथ म्हात्रे ह्या १३.११.२०१४** रोजी मु. मोरावे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत.

अर्जदार हे कै. विश्वनाथ काथोर म्हात्रे यांचे वारस आहेत.

मयत कै. विश्वनाथ काथोर म्हात्रे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलपमाणे

**मौजे वहाळ, ता. पनवेल जि. रायगड येथील**

| युनिट केस नं. | सर्वे नं. | हिस्सा | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ६२७ | ३३ | ५ | ०.०९.५ |

मौजे गव्हाण येथील वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादित झालेल्या आहेत. सबब मिळकतीबाबत **कै. विश्वनाथ काथोर म्हात्रे** यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे. कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

आज ता. २४/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, पनवेल**

## निवडक

### फसवणूक करणारे दोघे अटकेत

**पनवेल :** इस्टेट एजंटचे काम करणाऱ्या एका तरुणाच्या जागरूकतेमुळे बनावट नाव व कागदपत्रांद्वारे फ्लॅट भाड्याने घेऊन गैरकृत्य करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन भामट्यांना पोलिसांनी अटक केली. ही घटना खारघरमध्ये घडली आहे. पृथपालसिंग सहोता (वय ४८) आणि अनमोल सिंग उर्फ अमरिकसिंग बामारा (वय ६०) अशी या भामट्यांची नावे असून खारघर पोलिसांनी या दोघांना फसवणुकीसह बनावटगिरीच्या गुन्ह्याखाली अटक केली आहे. या दोघांनी फ्लॅट मालकाची फसवणूक करण्यासाठी बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून हा प्रकार केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले असले तरी खारघर पोलिसांकडून या दोघांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

### कंपनीची कोट्यवधींची फसवणूक

**पनवेल :** ड्रममधील केमिकलची परस्पर भिवंडी येथे विक्री करून ड्रममध्ये पाणी भरून कंपनीची एक कोटी १३ लाख ३७ हजार ४१९ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्वनाथ दत्तात्रय पाटील हे आयकी केमिकलमध्ये मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांच्या कंपनीने चीन या देशातून जेएनपीटी बंदरामध्ये मागवलेले आरएस-६०२ नावाचे केमिकलचे ४४ बॅरल व एचएमएस-२४०बी या नावाच्या केमिकलचे ८० बॅरल हे एलसीएल लॉजिस्टीक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, शिरढोण या कंपनीच्या गोडाऊनमध्ये ठेवले होते. त्यामध्ये गोडाऊनचे मनेजर भरत उंडे यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता ड्रममधील केमिकल हे परस्पर भिंवडी येथे विक्री करून ड्रममध्ये पाणी भरून कंपनीची एक कोटी १३ लाख ३७ हजार ४१९ रुपयांची फसवणूक केली.

# सीकेटी महाविद्यालयाला 'चॅम्पियनशिप'

## रायगड विभागीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये मिळविली सर्वाधिक पारितोषिके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाला 'रायगड जिल्हा विभागीय चॅम्पियनशिप' जिंकण्याचा बहुमान मिळविला आहे. सीकेटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन झालेल्या ५४व्या मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन रायगड विभागीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सलग १७ वर्ष सर्वाधिक १३ पारितोषिके प्राप्त करून देदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे.



दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धांमध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १६ महाविद्यालये सहभागी झाली होती. कोरोना काळ चालू असल्यामुळे ही स्पर्धा ऑनलाइन स्वरूपामध्ये घेण्यात आली. या स्पर्धांमध्ये नृत्य, अभिनय, साहित्य, फाईन आर्ट व संगीत या क्षेत्रांतील एकूण १५ वैयक्तिक प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने सर्वच्या सर्व स्पर्धा प्रकारामध्ये सहभाग घेतला होता. स्पर्धांपैकी १४ स्पर्धा प्रकारांचे निकाल जाहीर करण्यात आले. जाहीर झालेल्या १४ स्पर्धांच्या निकालांपैकी चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने १३ पारितोषिके प्राप्त केली.

या १३ पारितोषिकांपैकी पाच प्रथम क्रमांकाची पारितोषिके, सहा द्वितीय क्रमांकाची आणि दोन तृतीय क्रमांकाची पारितोषिके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत. सन २००५ ते २०२१ या १६ वर्षांमध्ये चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने या स्पर्धांमध्ये सर्वाधिक पारितोषिके प्राप्त केली होती. या वर्षीही सर्वाधिक पारितोषके प्राप्त करून सांस्कृतिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात निर्विवाद वर्चस्व प्राप्त केले आहे.

सर्व पारितोषिक विजेते विद्यार्थी, महाविद्यालयाचा सांस्कृतिक चमू व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. वी. येवले व सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप यांचे या देदिप्यमान यशाच्या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अनिल भगत, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सर्व कार्यकारी मंडळ सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर सेवकवर्ग यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### प्राप्त वैयक्तिक पारितोषिके

***चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक प्रिया चौधरी, भित्तीचित्र स्पर्धा प्रथम क्रमांक ज्योती धायगुडे, कार्टूनिंग स्पर्धा प्रथम क्रमांक ऋतुजा पाटील, सुगम संगीत प्रथम क्रमांक निलेश गायकवाड, एकपात्री अभिनय स्पर्धा हिंदी प्रथम क्रमांक मुग्धा दातार, शास्त्रीय वादन(तालवाद्य) स्पर्धा द्वितीय क्रमांक प्रथम गोवेकर, मराठी कथाकथन स्पर्धा द्वितीय क्रमांक मुग्धा दातार, मेंहदी द्वितीय क्रमांक रिया कर्ण, शास्त्रीय गायन द्वितीय क्रमांक कोमल राजगुरू, पाश्चात्त्य गायन स्पर्धा द्वितीय क्रमांक स्मीती गायकवाड, पाश्चात्त्य वादन द्वितीय क्रमांक प्रथम गोवेकर, वक्तृत्व अभिनय स्पर्धा मराठी तृतीय क्रमांक प्रिया चौधरी, मिमिक्री स्पर्धा तृतीय क्रमांक क्षितिज गायकवाड.***

# मृत्यूचे प्रमाणपत्र प्राथमिक आरोग्य केंद्रातून द्या

## नगरसेवक निलेश बाविस्कर यांची मागणी

**खारघर : प्रतिनिधी**

महापालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून मृत्यू प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी खारघरमधील नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन दिले आहे.

अंत्यविधीसाठी मृत नागरिकाचे प्रमाणपत्र बंधनकारक असल्याने बहुतांशी वेळेला मृत नागरिकाच्या नातेवाईकांना या प्रमाणपत्रासाठी खाजगी डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागते. अशा वेळी काही खाजगी डॉक्टरांकडून जास्तीच्या पैशाचीदेखील मागणी केली जाते. त्यामुळे नातेवाईक दुःखात असताना हा अशाप्रकारे आर्थिक भुर्दंड व मानसिक त्रास सहन करावा लागतो. गरीब गरजूंसाठी हा मोठा अडथळा ठरत असून याबाबत पालिका क्षेत्रातील आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या डॉक्टरांमार्फत हे प्रमाणपत्र दिल्यास मोठ्या प्रमाणात नागरिकांची गैरसोय दूर होईल. याबाबत आयुक्त गणेश देशमुख यांनी पुढाकार घेऊन पनवेल महानगरपालिकेने अशाप्रकारे निर्णय घेतल्यास नागरिकांकडून त्याचे स्वागत होईल, असे नगरसेवक बाविस्करांनी निवेदनात म्हटले आहे.

# प्रा. 'एनडीं'ना आदरांजली कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये महाराष्ट्राच्या पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या निधनानिमित्त आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि. २५) सायकांळी ५ वाजता करण्यात आले आहे.

वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या बॅरिस्टर पी. जी. पाटील सभागृहामध्ये होणाऱ्या या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, मॉडर्न स्कूलचे सर्व व्यवस्थापन सदस्य, तसेच विद्यालय व महाविद्यालयातील शिक्षकवृंद व कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. शासनाने कोरोनाविषयी दिलेल्या नियमाचे पालन करून सदर कार्यक्रम घेण्यात येईल, अशी माहिती प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी दिली.

पनवेल महानगरपालिका

जाहीर प्रकटन

सदर योजनेच्या स्किम बुकमध्ये अंतिम भूखंड क्र. ३०५ खालीलप्रमाणे नमूद आहे.

Form 1 See rules 6 (v) and 21 (1)

**TOWN PLANNING SCHEME PANVEL NO. 1 (2nd Variation)**

M.R.T.P. Act. 1966 Clause 91(2)

REDISTRIBUTION AND VALUATION STATEMENT

| SR. No. | Name of Owner | Tenure of land | Survey Number | Original Plot: O.P. Number | Original Plot: Area in Square Meters | Value in Rupees: Rate of Original Value Rs. Per M2 | Value in Rupees: Without reference to Value of Structures | Value in Rupees: Inclusive of structures | F.P Number | Area in Square meters |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3(a) | 3(b) | 4 | 5 | 6(a) | 6(b) | 6(c) | 7 | 8 |
| 288 A | Industrial Training Institue | | | 302 | 64291 | 5 | 321459 | 321459 | 305 | 66982 |

| Final Plot, Value in Rupees, Undeveloped: Rate of Sami-Final Value Rs. Per M2 | Undeveloped: Without reference to Value of Structures | Undeveloped: Inclusive of Structures | Developed: Rate of Final Value Rs. Per M2 | Developed: Without reference to Value of Structures | Developed: Inclusive of Structures | Contribution (+) Compensation (--) Col. 9 (c), Minus col.9(b) | Increment Col. 10(b) minus Col. 9(b) | Contribution Percent of Col. 12 | Addition to (+) or deduction from (--) contribution to be made under other sections | Net demand from (+) or by (-) owner, being the addition of columns 11, 13, 14 | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9(a) | 9(b) | 9(c) | 10(a) | 10(b) | 10(c) | 11 | 12 | 13 | 14 | 15 | |
| 5 | 334910 | 334910 | 8 | 535856 | 535856 | 13451 | 200946 | 100473 | - | 113924 | |

श्री. योगेश जयंत गोखले यांचे शासनाकडे दिलेल्या निवेदनानुसार नगर रचना योजनेच्या फॉर्म-१ व नकाशामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेकामी अर्ज दिला आहे.

Form 1 See rules 6 (v) and 21 (1)

**TOWN PLANNING SCHEME PANVEL NO. 1 (2nd Variation)**

M.R.T.P. Act. 1966 Clause 91(2)

REDISTRIBUTION AND VALUATION STATEMENT

| SR. No. | Name of Owner | Tenure of land | Survey Number | Original Plot: O.P. Number | Original Plot: Area in Square Meters | Value in Rupees: Rate of Original Value Rs. Per M2 | Value in Rupees: Without reference to Value of Structures | Value in Rupees: Inclusive of structures | F.P Number | Area in Square meters |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3(a) | 3(b) | 4 | 5 | 6(a) | 6(b) | 6(c) | 7 | 8 |
| 288 B | Gopal Sitaram Gokhale<br>Shridhar Sitaram Gokhale<br>Narayan Sitaram Gokhale<br>Mukund Sitaram Gokhale | | 389/ 1 (part) | 500 | 3406 | 5 | 17030 | 17030 | 305/A | 2587 |

| Final Plot, Value in Rupees, Undeveloped: Rate of Sami-Final Value Rs. Per M2 | Undeveloped: Without reference to Value of Structures | Undeveloped: Inclusive of Structures | Developed: Rate of Final Value Rs. Per M2 | Developed: Without reference to Value of Structures | Developed: Inclusive of Structures | Contribution (+) Compensation (--) Col. 9 (c), Minus col.9(b) | Increment Col. 10(b) minus Col. 9(b) | Contribution Percent of Col. 12 | Addition to (+) or deduction from (--) contribution to be made under other sections | Net demand from (+) or by (-) owner, being the addition of columns 11, 13, 14 | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9(a) | 9(b) | 9(c) | 10(a) | 10(b) | 10(c) | 11 | 12 | 13 | 14 | 15 | |
| 5 | 12935 | 12935 | 8 | 20696 | 20696 | 4095 | 7761 | 3881 | - | 214 | |

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस/१७१६/१९०८/प्र.क्र.४१/१९/नवि-१२, दिनांक १९/०९/२०१९ ने नगर रचना योजनेमध्ये दुरुस्ती करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ९१ (२) नुसार पनवेल महानगरपालिकेस प्राधिकृत केले आहे.

त्याअर्थी, अंतिम भूखंड क्र. ३०५ मध्ये नगर रचना योजना पनवेल क्र. १ (प्र.फे.) अंतिमचे स्किम बुक व नकाशामध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत नागरिकांना सूचना व हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी हे जाहीर प्रकटन महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३२ दिवसाच्या मुदतीत लेखी स्वरुपात महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावे. सदर प्राप्त सूचना व हरकती प्रस्तावांचा विचार महानगरपालिका अंतिम मंजुरीच्या वेळी करणेत येईल व मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती सूचना विचारात घेतल्या जाणार नाही.

उपरोक्त दुरुस्तीबाबतची माहिती नागरिकांच्या माहितीस्तव व अवलोकनार्थ महानगरपालिकेच्या कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून ठेवण्यात आलेली आहे.

**जा.क्र./पमपा/नरवि/९९-२२/प्र.क्र.०४/१६१/२०२२**
**दिनांक :- १९/०१/२०२२**

**सही/-**
**(ज्योती कवाडे)**
सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका

# कोरोना रुग्णांसाठीच्या मार्गदर्शक सत्राचे उद्घाटन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून कोरोनाबाधित रुग्णांना वेबेक्स ॲपच्या माध्यमातून राष्ट्रीय व राज्य कृती दलाच्या सदस्यांकडून ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन मिळणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन झाल्याचे डॉ. कविता चौतमोल यांनी सोमवारी (दि. २४) जाहीर केले.

राज्य कृती दलाचे सदस्य फोर्टिस रुग्णालय मुलूंड येथील डॉ. राहुल पंडित यांनी या सत्राचे उद्घाटन केले. या वेळी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, डॉ. चारूदत्त वैती, डॉ. बिंदू, डॉ. सखाराम गराळे, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी उद्घाटन केल्याचे जाहीर करीत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या तिसऱ्या लाटेत नागरिक काळजी घेताना दिसत नाही. विलगीकरणामधील रुग्णांना आवश्यक ती माहिती या वेबिनारच्या माध्यमातून दिली जाणार असल्याचे सांगितले. सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या लाटेत नागरिक आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असून या वेबिनारमुळे जनजागृती व फायदा होणार असल्याचे सांगितले. महानगरपालिका आयुक्त व डॉ. सखाराम गराळे यांनी ही माहिती दिली.

# पाले खुर्दमध्ये नेत्रतपासणी शिबिरास प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपक फर्टिलायझर ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ईशान्य फाउंडेशन व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेलच्या संयुक्त विद्यमाने पाले खुर्द येथे नुकतेच नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करण्यात आले असून एकूण २४३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ८२ रुग्णांना दृष्टीची समस्या, तर ९३ रुग्णांना मोतीबिंदूची समस्या असल्याचे आढळून आले. दृष्टीची समस्या असलेल्या रुग्णांना चष्म्याचे वाटप करण्यात आले आणि ज्या रुग्णांना मोतीबिंदूची समस्या आहे, त्यांच्या शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट येथे करण्यात आले. सर्व शस्त्रक्रिया दीपक फर्टिलायझर ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीमार्फत करण्यात येत आहेत.



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ८१ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे भावेपठार, ता. महाड येथील रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | २२०९८५१ | २३००० | ६००/- | ३ महिने | वर्ग पांच अ व वरील |
| २. | दहिवली ते ढाकशेळी रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १९८०७३० | २०००० | ६००/- | ३ महिने | वर्ग पांच अ व वरील |
| ३. | मौजे जुई मोहल्ला, ता. महाड ते बौद्धवाडी रस्ता डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १७७८६०५ | १८००० | ६००/- | ३ महिने | वर्ग पांच अ व वरील |
| ४. | ग्रा.पं. न्हावे मौजे न्हावे ते लोणेरे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (डोंगरी) | १३३७७६५ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ५. | मौजे वडपाले येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (डोंगरी) | १३३४८७० | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ६. | मौजे चांदोरे, ता. माणगांव मौजे चांदोरे येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १३३३०३८ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ७. | मौजे चांदोरे, ता. माणगांव गावातील अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १३३१६६७ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ८. | मौजे मांजरवणे, ता. माणगांव येथील रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १३३१६६७ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ९. | मौजे कोंडमालुसरे, ता. महाड ते जि.प. शाळा येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १३२९१५९ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १०. | मौजे कुर्ले बौद्धवाडी, ता. महाड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १३२३१६३ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ११. | रोहा तांबडी रस्ता प्र.जि.मा. ५०, कि.मी. १/०० ते १/५०० मध्ये अपघात प्रतिबंध उपाययोजना करणे (क्रॅश बॅरिअर बसविणे.) तालुका रोहा, जिल्हा रायगड, (गट क) | १३२६५२३ | १४००० | ६००/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२५/०१/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०८/०२/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **१०/०२/२०२२** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२७६**
**दिनांक : २०/०१/२०२२**

**सही/**
**(आर. के. बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# पागोट्यात घंटागाडी, पाणीपुरवठा करणाऱ्या ट्रॉलीचे लोकार्पण

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पागोटे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या स्वच्छतेसाठी घंटागाडी व पाणीपुरवठा करणारी ट्रॉली आणण्यात आली आहे. या ट्रॉलीचा लोकार्पण सोहळा सोमवारी (दि. २४) ग्राम सुधार मंडळ पागोटे गाव विकास अध्यक्ष आशिष तांडेल, सरपंच मिलिंद तांडेल यांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, माजी सरपंच योगेश पाटील, महेश पाटील, विजय पाटील, ग्रामसुधार मंडळ पागोटे गावचे उपाध्यक्ष निरज पाटील, खजिनदार मनिष पाटील, टेम्पोचालक मालक संघटनेचे अध्यक्ष नितीन पाटील, भालचंद्र तांडेल, ग्रामपंचायत उपसरपंच हर्षाली पाटील, सदस्य सुमित पाटील, समीर पाटील, प्रदीप पाटील, कामिनी पाटील, रश्मी म्हात्रे, वनिता पाटील, हर्षाली पाटील, मीता पंडित आदी उपस्थित होते.

ग्रामपंचायत फंडातून घंटागाडी व पाणीपुरवठा करणारी ट्रॉली पागोटे गावासाठी आणण्यात आल्याने उपस्थित ग्रामस्थांनी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचे आभार मानले.



## संपादकीय

### ही संघर्षाची भूमी

स्वर्गीय दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिल्याखेरीज मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, भिवंडी, डोंबिवली आणि रायगड जिल्ह्यातील भूमिपूत्र स्वस्थ बसणारच नाहीत, पण लोकभावनेचा अनादर करणाऱ्यांना हा संघर्ष किती पेटू शकतो याची कल्पना अद्याप आलेली दिसत नाही. विमानतळाचे सुयोग्य नामकरण सोडाच, संबंधित प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचे निराकरण करण्याची तत्परताही सिडकोच्या ठायी दिसत नाही. ही बेपर्वाई चव्हाट्यावर आणण्यासाठीच सोमवारी विमानतळ काम बंद आंदोलन करण्यात आले. यापुढेही सिडकोची असमर्थता अशीच राहिल्यास हा संघर्ष शिगेला पोहचेल यात शंका नाही.

**नवी मुंबई विमानतळाला ज्येष्ठ नेते स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी २००८पासून केली जाते आहे. अनेक संस्था, संघटनांच्या सोबतच नामवंतांनी वैयक्तिक पातळीवरही या संदर्भात सिडकोकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सत्ताधाऱ्यांनी या मागणीकडे पाहिले पाहिजे, पण अद्याप तरी त्या दिशेने काहीही हालचाल दिसत नाही. इतकेच काय तर विमानतळाच्या प्रकल्पासाठी ज्या २७ गावांच्या जमिनी घेतल्या, त्यांचेही अनेक प्रश्न सोडवण्याबाबत सिडको कमालीची उदासीन दिसते. विमानतळासाठी घातलेल्या भरावामुळे पावसाळ्यात या गावकऱ्यांच्या गावांत पाणी भरते. घरे तोडून गाव सोडून जाण्याचा मार्गही मोकळा झालेला नाही. अठरा महिन्यांचे भाडे देणाऱ्या सिडकोकडून दोन-दोन वर्षे घरबांधणीसाठी परवानगीच मिळत नाही. अनेकांना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही. त्यामुळे जन्म-मृत्यूसारख्या मूलभूत नोंदी करवून घेण्यातही अडचणी येत आहेत. हा अवघा मनस्ताप या गावकऱ्यांनी कशासाठी बरे सहन करायचा? सिडकोच्या या हलगर्जीपणाचा निषेध म्हणून सोमवारी ओवळे फाटा येथे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीमार्फत विमानतळ लाक्षणिक काम बंद आंदोलन करण्यात आले. हजारोंच्या संख्येने उपस्थित राहात, आता पेटवू सारे रान असा एल्गार करीत भूमिपुत्रांनी या वेळी सिडकोला एक महिन्याचा इशारा दिला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन सिडकोने स्वत:हूनच विमानतळाचे काम बंद केले, पण यापूर्वी काम बंद आंदोलन करण्याचे २७ गाव संघर्ष समितीने जाहीर केले, तेव्हा मात्र पोलिसांच्या मध्यस्थीने झालेल्या बैठकीत निव्वळ सांगतो, बघतो, माहिती घेतो अशी आश्वासने देऊन प्रकल्पग्रस्तांची बोळवण करण्यात आली. राज्यात कोरोना आणि या विषाणूचा नवा अवतार ओमायक्रॉनच्या फैलावाने पुन्हा एकदा निर्बंध लादलेले असताना अशा चिंताजनक परिस्थितीत आंदोलन करण्यास गावकऱ्यांना का भाग पाडण्यात आले? आपल्या व्यथा मांडण्यासाठी तेव्हाही गावकऱ्यांसमोर आंदोलनाखेरीज अन्य पर्याय नव्हता आणि यापुढेही असणार नाही. सत्ताधाऱ्यांची भूमिका सकारात्मक होत नाही तोपर्यंत ही लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल, असे प्रतिपादन या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आणि याच भूमिकेवर अवघे आंदोलनकर्ते भूमिपुत्र ठाम आहेत. सरकारला जनभावनेचा आदर करावाच लागेल. विमानतळासाठी आपल्या जमिनी, आपली गावेच नव्हे तर राहती घरेही देणाऱ्या या गावकऱ्यांच्या समस्यांमध्ये सिडकोला लक्ष घालावेच लागेल. या प्रकल्पग्रस्तांच्या प्रति सिडकोचे आणि सत्ताधाऱ्यांचे काहीच उत्तरदायित्व नाही काय? की प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न वाऱ्यावर सोडून देणे हा सिडकोच्या कार्यपद्धतीचा एक अविभाज्य भाग झाला आहे? तसे असल्यास 'दिबां'नी दिलेला संघर्षाचा मूलमंत्र भूमिपुत्रांच्या मनावर कोरलेला आहेच. प्रकल्पग्रस्तांना त्यांचे हक्क मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील.**

# महाड एमआयडीसीत वाहतूक नियोजनाचा अभाव



**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांत येणारी अवजड वाहने औद्योगिक परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा उभी केली जात असल्याने प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडीचा आणि अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महाड औद्योगिक क्षेत्राला ट्रक टर्मिनल (वाहनतळ)ची आवश्यकता आहे. मात्र या समस्येकडे एमआयडीसी प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.

महाड एमआयडीसीमध्ये असलेल्या कारखान्यातील मालाची आवक-जावक करण्यासाठी विविध ठिकाणाहून ट्रक, टँकर, ट्रॉली, क्रेन आणि इतर अवजड वाहने ये-जा करत असतात, मात्र कारखान्यातील मालाची वाहतूक करण्यासाठी आलेली वाहने कंपनीच्या आवारात उभी केली जात नाहीत. कंपनीच्या आवाराबाहेर रस्त्यालगत ही वाहने उभी केली जात असल्याने एमआयडीसीमधील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीस कायम अडथळा निर्माण होत आहे. यातील काही वाहने ही मुंबई-गोवा महामार्गावर नडगाव गावाजवळ दुतर्फा उभी केली जातात. या ठिकाणी उभ्या असलेल्या अवजड वाहनांमुळे औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. हीच स्थिती नांगलवाडी फाटा ते महाड औद्योगिक पोलीस ठाण्यापर्यंत दिसून येत आहे. महाड नांगलवाडी ते एमआयडीसी हा मार्ग संपूर्णपणे या अवजड वाहनांनी व्यापलेला आहे. प्रमुख मार्गावरील सुदर्शन केमिकल, हायकल, प्रीव्ही ऑरगॅनिक, कोप्रान, या कंपन्यांसमोर अवजड वाहने कायम उभी असतात. आसनपोई गावाकडे जाणाऱ्या मार्गावर आणि जिते गावाकडे जाणाऱ्या धारिया इमेप्क्स, टायटन, कुसगाव गावाच्या मार्गावर एम्बायो, अनंत ऑरगॅनिक, इफ्का या कंपन्यांसमोर कायम उभ्या असणाऱ्या अवजड वाहनांचा स्थानिक ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून औद्योगिक क्षेत्र विकसित करताना कारखान्यांना सोयी-सुविधा देणे बंधनकारक आहे, मात्र आजही अनेक सुविधा केवळ कागदावर राहिल्या आहेत. यातील ट्रक टर्मिनलकरिता सातत्याने मागणी केली जात आहे. अवजड वाहनांमुळे या रस्त्यांवर अपघात होण्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. रस्त्याच्या दुतर्फा अवजड वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीसदेखील अडथळा निर्माण होत आहे. यामुळे संबंधित कंपन्यांनी आपल्या आवारात अवजड वाहने उभी करावीत, अशा सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत, मात्र कंपन्यांच्या आवारात असलेली जागेची मर्यादा आणि येणाऱ्या वाहनांची संख्या अधिक असल्याने हे ट्रक बाहेर रस्त्यावर उभे केले जातात. महाड, बिरवाडी आणि पुढे जाणाऱ्या स्थानिक ग्रामस्थांच्या प्रवासी वाहनांनादेखील त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. महाडमधून बिरवाडी आणि परिसरात एसटी वाहतूक, रिक्षा आणि इतर वाहनांची कायम वर्दळ असते. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

ट्रक टर्मिनलकरिता महाड एमआयडीमध्ये अग्निशमन दलाच्या जवळच एक प्लॉट १९९९ मध्ये विकसित करण्यात आला होता, मात्र हा प्लॉट एका कंपनीला देण्यात आला. भूखंड क्रमांक आर सात तर शेजारील ६००० चौरस मीटरचा मोकळा प्लॉट इंडिया पॉवर पार्टनर्स या कंपनीला देण्यात आला होता. मात्र १२ एप्रील २०१७ रोजी हा प्लॉट ट्रक टर्मिनलकरिता हस्तांतर करण्याची विनंती एमआयडीसीने केली आहे. ट्रक टर्मिनलकरिता राखीव असलेला हा प्लॉट खाजगी कंपनीला कसा दिला हा प्रश्नच आहे. सध्या हा प्लॉटदेखील या कंपनीने परत केल्याचे एमआयडीसी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी आजदेखील याच प्लॉटवर काही ट्रक उभे केले जात आहेत.

## रायगडात पारा घसरला; कडाक्याच्या थंडीने भरली हुडहुडी!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडकर गेली काही दिवस गुलाबी आणि कडाक्याच्या थंडीचा अनुभव घेत असताना शनिवारपासून हवामानात अचानक बदल झाल्याने पारा कमालीचा खाली घसरला. परिणामी रायगडकर पुन्हा गारठले आहेत.

थंडी ही आरोग्याला पोषक मानली जाते, परंतु कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच. गुलाबी थंडी हवीहवीशी वाटते, पण बोचरी थंडी त्रासदायक ठरते. गेल्या दोन दिवसांत रायगडकर या बोचऱ्या थंडीने त्रस्त झाले आहेत. शनिवारी रायगड जिल्ह्यातील काही भागात अवकाळी पाऊस झाला. थंड वारे वाहू लागले. त्यानंतर धुळकट वातावरण आणि वाढत्या गारव्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. आधीच जिल्ह्यातील कोरोनाच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत असल्याने चिंतेचे वातावरण आहे. त्यात या थंडीत सर्दी-खोकल्याचा त्रास अधिकच जाणवत आहे.

कोवळे ऊन, म्हणजे सकाळी ८ ते १०ची वेळ मानली जाते, पण गेले दोन दिवस रायगडात भर दुपारीदेखील उन्हाचा चटका जाणवत नव्हता, इतका गारवा वातावरणात दिवसभर होता. ऐन दुपारी कोवळे ऊन अंगावर घेतल्यासारखे वाटत होते.


**आंबा मोहरला**

थंडी जशी आरोग्यदायी तशीच ती फळ पिकासाठी पोषक असते. विशेषतः आंब्याच्या पिकासाठी थंडी खूपच फायदेशीर ठरते. सातत्याने वातावरण बदलत असतानाही यंदा आंबा चांगलाच मोहरला असल्याचे पाहायला मिळत आहे. मधूनच अवकाळी पावसामुळे बागायदार चिंतेत आहेत, मात्र सद्यस्थितीत आंबा मोहरत असल्याचे समाधान व्यक्त होत आहे.




# कर्जत तालुक्यात बिबट्याचा संचार

## जनावरांवर हल्ला; ग्रामस्थ धास्तावले; वनविभागाकडून गस्त





(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील शिरसे येथे मागील महिन्यात बिबट्याच्या पिल्लाचे दर्शन झाल्यानंतर मागील तीन दिवस आसल आणि बेकरे भागात बिबट्याचे दर्शन झाले. त्याने काही जनावरांना आपले लक्ष्य केल्याने कर्जत तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, बेकरे, जुम्मापट्टी भागात ग्रामस्थांनी गस्त घालण्यास सुरुवात केली आहे, तर वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा आणण्याची तयारी सुरू केली आहे.

कर्जत तालुक्यात आजही २५ टक्के क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जंगल आहे. त्या भागात दरवर्षी हिंस्त्र प्राणी दिसून येत असतात. मागील काही वर्षात खांडस, अंभेरपाडा, पाली, पोटल, हुमगाव या भागात बिबट्याने शेळ्या, मेंढ्या आणि गायी यांना शिकार केले होते. मागील डिसेंबर महिन्यात तालुक्यातील शिरसे भागात दोन दिवस बिबट्याच्या पिल्लाचे दर्शन ग्रामस्थांना झाले होते. त्यानंतर प्राणीगणना करताना कर्जत पश्चिम विभागाचे वनरक्षक सुहास मगर यांना पहाटेच्या वेळी आसल भागातील जंगलात बिबट्याचे दर्शन झाले. त्या बिबट्याचे वयोमान साधारण दोन वर्षाचे असेल, अशी माहिती वनक्षेत्रपाल निलेश भुजबळ यांनी दिली. त्यानंतर वनविभाग सतर्क झाला आहे, मात्र मागील दोन दिवस बेकरे गावाच्या घनदाट जंगलात बिबट्याने दर्शन दिले. या बिबट्याने सहा कुत्र्यांना फस्त केले आहेत. तर एक म्हैस आणि काही जनावरांना बिबट्याने जखमी केले आहे. त्यामुळे बेकरे ग्रामस्थांनी रात्रीची गस्त घालण्यास सुरुवात केली आहे. २२ जानेवारीच्या रात्री मानवी वस्तीत घुसण्याचा प्रयत्न करीत असलेल्या बिबट्याला ग्रामस्थांनी आरडाओरड करून पिटाळून लावले, अशी माहिती वनविभागाने दिली.

बिबट्या मानवी वस्तीत घुसण्याची शक्यता लक्षात घेऊन वनक्षेत्रपाल भुजबळ यांनी सोमवारी (दि. २४) अलिबागला जाऊन जिल्हा उपवन संरक्षकांकडे बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा नेण्याची परवानगी मागितली आहे.

**आमच्या गावाजवळील जंगलाला लागून असलेल्या मानवी वस्तीत काल बिबट्या घुसला होता. गस्तीवर असलेल्या ग्रामस्थांनी त्याला पिटाळून लावल्याने अनर्थ टळला आहे.**

**-संदेश कराळे, ग्रामस्थ, बेकरे, ता. कर्जत**

**बिबट्याचा वावर दिसून आल्यास ग्रामस्थांनी तत्काळ वनविभागाला कळवावे. स्थानिकांनी रात्रीच्या वेळी एकटे घराबाहेर पडू नये, स्वत:ची काळजी घ्यावी. वन कर्मचारी आणि पोलीस यांच्याकडून गस्त घालण्यात येत आहे. त्यामुळे घाबरून जाण्याची आवश्यकता नाही.**

**-निलेश भुजबळ, वनक्षेत्रपाल, कर्जत पश्चिम**

**बिबट्या मानवी वस्तीत घुसून हल्ला करण्याची भीती लक्षात घेता प्रशासनाकडून वनविभागाला खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लागणार असेल तर त्याबाबत उचित कार्यवाही करण्याची सूचना प्रशासन देईल.**

**-अजित नैराळे, प्रांत अधिकारी, कर्जत**

## आरोग्य प्रहर

### रात्री झोपण्यापूर्वी नारळाचे सेवन फायदेशीर

नारळाचे अनेक फायदे आहेत. नारळात अनेक औषधी गुणधर्म असल्यामुळे नारळाचे सेवन करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. नारळात अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असतात. तसेच नारळामध्ये विविध प्रकारचे पोषण तत्त्वे देखील आढळून येतात. त्यामुळेच पूर्वीपासून विविध भारतीय पदार्थांमध्ये नारळाचा मोठ्याप्रमाणात वापर होतो. दक्षिण भारतामध्ये तर जवळपास सर्वच पदार्थांमध्ये नारळाचा वापर केला जातो. कच्चे नारळ खाण्याचा आणखी एक फायदा म्हणजे यामुळे तुमच्या तोंडाचादेखील व्यायाम होतो. झोपण्यापूर्वी नारळ खाण्याचे अनेक फायदे आहेत. आज आपण त्याबद्दल जाणून घेणार आहोत.



**बद्धकोष्ठतेच्या समस्येमध्ये उपयुक्त**

ज्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास आहे, अशा लोकांनी नियमितपणे नारळ खावे. कारण नारळामध्ये मोठ्याप्रमाणात फायबर असते. ज्यामुळे तुमची पचनशक्ती वाढते. अन्न पचल्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या आपोआप नाहीशी होते, तसेच नारळाचे नियमित सेवन हे तुम्हाला पोटाच्या विविध आजारांपासून देखील दूर ठेवते.

**हृदय निरोगी ठेवते**

झोपण्यापूर्वी कच्चे नारळ खाल्ल्याने हृदय निरोगी राहते. यामध्ये असलेले सॅच्युरेटेड फॅट शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवते. अशा प्रकारे, नारळ हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी करू शकते. नारळ हे हृदयासाठी खूप फायदेशीर असून, ज्यांना हृदयाशी संबंधित काही समस्या आहेत त्यांनी नारळाचे सेवन केले पाहिजे.

**वजन नियंत्रित करते**

नारळ हे जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सचा उत्कृष्ट स्त्रोत आहे. नारळाचे नियमित सेवन केल्यास तुमच्या शरीरातील अतिरिक्त कॅलरीज या बर्न होतात. त्यामुळे तुमचे वजन नियंत्रित राहाते, तसेच नारळाच्या नियमित सेवनामुळे तुमचे स्नायूदेखील अधिक मजबूत होतात.

**त्वचेसाठी फायदेशीर**

मुरूम किंवा डाग यासारख्या त्वचेच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी नारळ फायदेशीर आहे. तुम्हाला जर अधिक चांगला परिणाम हवा असेल, तर झोपण्यापूर्वी एक तास आधी नारळाचे सेवन करा. असे केल्याने त्वचेशी संबंधित समस्या दूर होतील.

## आयबीएस परीक्षेत शेलू गावातील तरुण देशात ९५वा

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील शेलू गावातील समीर अशोक डुकरे यांनी कृषी अर्थशास्त्राची पदवी मिळविताना आयबीएस परीक्षेत देशात ९५वा क्रमांक प्राप्त केला आहे. त्यांची तत्काळ महाराष्ट्र बँकेच्या अ‍ॅग्रिकल्चर फिल्ड मॅनेजर पदावर नियुक्ती झाली आहे.



समीर डुकरे यांनी शेलू गावात प्राथमिक, तर दहावीपर्यंतचे शिक्षण शेलू बांधिवली येथील माध्यमिक शाळेत आणि बारावीपर्यंतचे शिक्षण कर्जत शहरातील अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेत घेतले. त्यानंतर दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात कृषी पदवीचे शिक्षण घेतले. कृषी अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी त्यांनी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात प्रवेश घेतला.

कृषी अर्थशास्त्राची परीक्षा देशस्तरावर होत असते आणि त्या पदव्युत्तर परीक्षेत ८४ टक्के गुण मिळवून समीर डुकरे यांनी देशात ९५वा क्रमांक पटकावला आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती व राष्ट्रीय हितसंवर्धक मंडळ खोपोली शाखा, यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २३) येथील लोहाणा समाज सभागृहात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ९४ जणांनी रक्तदान केले.



(छाया : विनायक माडपे)

शिबिराचे उद्घाटन रा. स्व. संघ जिल्हा बौद्धिक प्रमुख आनंद जोशी (पनवेल) व लोहाणा समाज ट्रस्टचे अध्यक्ष शैलेश विठलानी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कोविड-१९चे नियम पाळून नोंदणी केलेल्या रक्तदात्यांना ठरवून दिलेल्या वेळेत निमंत्रित करण्यात येत होते. समर्पण ब्लड बँक (मुंबई)चे डॉ. विश्वकर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली नर्स व तंत्रज्ञ लता दिसले, स्नेहल कांबळे, अनिता राऊळ, सज्jाद शेख, अजय देवरूखकर, रोहन साळवी, अक्षय कदम, सोहन जाधव, सुजल सोने, अभिषेक मौर्य आदींनी शिबिर यशस्वितेसाठी सहकार्य केले.

रा. स्व. संघाचे जिल्हा संपर्कप्रमुख राकेश पाठक, जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे, महामार्ग प्रमुख रोहित कुलकर्णी, खालापूर तालुका कार्यवाह अविनाश मोरे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष देवेंद्र जाखोटिया, खालापूर संपर्कप्रमुख सुधाकर भट, साजगाव विभागाचे प्रमुख कार्यकर्ते गौरव तटकरे, अतुल कोठारी, जयेश अभानी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पेणमधील दादर गावातील विकासकामांचे आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील दादर येथील विविध विकासकामांचे सोमवारी (दि. २४) आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यापुढील जिल्हा परिषद सदस्य दादर गावातीलच होणार असून, गावात लवकरच अस्थी विसर्जन घाटासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी दिली.

पेण तालुक्यातील दादर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून तब्बल दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून रस्त्यांचे डांबरीकरण, जुना तलाव सुशोभीकरण, पूरनियंत्रण संरक्षण बंधारा, अंगणवाडी इमारत, अंतर्गत रस्ते, निवारा शेड, परिसर सुशोभीकरण, रस्ते काँक्रीटीकरण, प्राथमिक शाळा इमारत दुरुस्ती, लादी बसविणे आदी १६ विकास कामे करण्यात येणार आहेत. त्यांचे भूमिपूजन सोमवारी आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

दादर गाव माझे असून मी या गावचा हक्काचा माणूस असल्याने हा निधीच नाही तर यापेक्षाही जास्त निधी देऊन या गावाला झुकते माप द्यायचे आहे. सध्या दादर हे भांडण विरहित गाव झाले आहे. यापुढे गावाला सुजलाम सुफलाम करायचे आहे. संबंधित मंत्र्यांशी बोलून या ठिकाणी संरक्षक बंधारा बांधून घेण्यासाठी मी प्रयत्नशील असणार आहे. आपण केलेल्या विकासकामांच्या जोरावर यापुढील पंचायत समिती व जिल्हा परिषदेचा सदस्य हे दादर गावातीलच असतील, असा विश्वास आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

जि. प.चे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, भाजप तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, दादर सरपंच विजय पाटील, पं. स. माजी सभापती नाशिकेत पाटील, माजी सरपंच मोहन नाईक, गोरखनाथ पाटील, गजानन पाटील, प्रल्हाद पाटील, मोहन पाटील, ज्ञानेश्वर पाटील, भरत पाटील यांच्यासह ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपकडून नाना पटोले यांच्या प्रतिमेचे दहन

**अलिबाग : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल वादग्रस्त विधान करणारे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रतिमेचे अलिबाग येथे दहन करून भारतीय जनता पक्ष दक्षिण रायगड जिल्ह्यातर्फे त्यांचा निषेध करण्यात आला.

अलिबाग येथील भाजप कार्यालयासमोर पक्ष कार्यकर्त्यांनी नाना पटोले यांच्याविरोधात घोषणा दिल्या व त्यांच्या प्रतिमेचे दहन केले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, शहर अध्यक्ष अ‍ॅड अंकीत बंगेरा, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष अशोक वारगे, सतीश लेले, अ‍ॅड. पल्लवी तुळपुळे, अजित भाकरे, कामगार आघाडी जिल्हा संयोजक रवींद्र पाटील, युवा मोर्चाचे रोहित जाधव, तुषार भगत, अजिंक्य पाटील, निखिल चव्हाण, जगदिश घरत, समीर राणे, अ‍ॅड. मनस्वी महेश मोहिते, आतिश गायकवाड, प्रशांत पाटील, हर्षल तांडेल, आदित्य नाईक आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



(छाया : जितू शिगवण)

# श्रीवर्धनच्या समुद्रात नौकेला जलसमाधी; चार जण बचावले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

जीवना बंदर येथील श्रीकृष्ण सहकारी मत्स्य व्यावसायिक संस्थेच्या लक्ष्मी विजय नौका (आयएनडी एमएच ३ एमएम ४१९३) रविवारी (दि. २३) समुद्रात बुडाली. नौकेतील चार खलाशी बचावले, मात्र लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

## लाखोंचे नुकसान

समद्रामध्ये होत असलेल्या छोट्या-मोठ्या वादळामुळे मच्छीमारी धोक्यात आली आहे. रविवारी दुपारनंतर येथील समुद्रात सोसाट्याचे वारे वाहायला सुरुवात झाली. त्यामुळे मच्छीमार आपल्या नौका मूळगाव येथील खांडीमध्ये सुरक्षित ठिकाणी नेत असताना अनिकेत लक्ष्मण रघुवीर यांच्या लक्ष्मी विजय नौकेचे सुकाणू तुटले व नौका भरकटली. ती दगडावर आदळल्याने नौकेला जलसमाधी मिळाली. या नौकेमधील अनिकेत रघुवीर यांच्यासह बाळकृष्ण रघुवीर, जयेश रघुवीर, गणेश कुलाबकर हे खलाशी समुद्राच्या पाण्याशी झुंज देत बालंबाल बचावले, मात्र लक्ष्मी विजय नौका व जाळी मिळून सुमारे १२ ते १५ लाख रुपयांचे नुकसान झाले.


**आदर्श को-ऑप. हौऊसिंग सोसायटी लि. पनवेल**

(रजि. नं. केबीए/एचएसजी/१०५, ता. २३/०७/१९६५)

आदर्श को-ऑप. हौ. सोसायटी लि. पनवेल मधील Open Space 'C' साठी Fensing व गेट बनवायचे आहे. इच्छुकांनी कार्यालयात संपर्क करून कामाचे स्वरुप समजावून घ्यावेत व Details (Specification) घेऊन जावेत.

आपणास इच्छा असल्यास त्या कामाचे कोटेशन आठ दिवसात आदर्श सोसायटीच्या दप्तरी जमा करावेत.

दि. २४/०१/२०२२

सही/-
श्री. संतोष मुनोथ
अध्यक्ष
आदर्श को-ऑप. हौ. सोसायटी लि.
५२ बंगला एरिया, पनवेल - ४१०२०६.


# -:जाहीर सूचना:-

**सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ चे रुंदीकरण करण्यासाठी पेण तालुक्यातील मौजे नागोठणे, ता. रोहा या गावातील जमिनी संपादीत होत आहेत. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ A अधिसूचना मराठी व इंग्रजी मध्ये भारत राजपत्रात दिनांक. १६ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास दिनांक २४/०२/२०२२ पर्यंत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण विभाग पेण यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.**

**स्थळ :- पेण**
**दिनांक :-१८/०१/२०२२**

**सही/-**
**(विठ्ठल इनामदार)**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी पेण**
**उपविभाग पेण**

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-17122021-231933
CG-DL-E-17122021-231933

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 4852] नई दिल्ली, बृहस्पतिवार, दिसम्बर 16, 2021/अग्रहायण 25, 1943
No. 4852] NEW DELHI, THURSDAY, DECEMBER 16, 2021/AGRAHAYANA 25, 1943

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

नई दिल्ली, 16 दिसम्बर, 2021

**का.आ. 5233(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 0.00 से कि.मी.84.00 (पनवेल इंदापुर सेक्शन ) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् सक्षम प्राधिकारीतथा उपविभागीय अधिकारी, पेण शासकीय वसाहत एरिया, मुंबई गोवा नॅशनल हायवे नं. 66,पेण ,महाराष्ट्र को लिखित रूप मे प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 0.00 से कि.मी. 84.00 (पनवेल इंदापुर सेक्शन) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।

| राज्य का नाम: महाराष्ट्र | | जिले का नाम: रायगड | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: रोहा | | | | | |
| गांव का नाम: नागोठणे (सी.टी.) | | | | | |
| 1 | 127/2/A/1/A/1 P | निजी | वेट | 0.1300000(हेक्टेयर ) | 0.1300000 |
| 2 | 18/A/1/B/3 | निजी | वेट | 0.1300000(हेक्टेयर ) | 0.1300000 |
| 3 | 244 P | निजी | वेट | 0.0600000(हेक्टेयर ) | 0.0600000 |
| 4 | 244/1/A/1 P | निजी | वेट | 0.1100000(हेक्टेयर ) | 0.1100000 |
| 5 | 244/1/A/1A/2 P | निजी | वेट | 0.0900000(हेक्टेयर ) | 0.0900000 |
| | | | कुल | 0.5200 | 0.5200 |

[फा. सं. NHAI/BOT-I/11013/18/2006, NHAI/BOT-I/11013/20/2007/3A]

राजेश गुप्ता, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

New Delhi, the 16th December, 2021

**S.O. 5233(E).**— In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH66 (Old 17) in the stretch of land from Km. 0.00 to Km. 84.00 (Panvel - Indapur section) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Competent Authority and Sub Division Officer, Pen shashkiya Vasahat area, Mumbai Goa National Highway No. 66, pen, Maharashtra, in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH66 in the stretch of land from Km. 0.00 to Km. 84.00 (Panvel - Indapur section) of NH66 in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA.

| State: MAHARASHTRA | | District: RAIGAD | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl.No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Roha | | | | | |
| Village: Nagothane (CT) | | | | | |
| 1 | 127/2/A/1/A/1 P | Private | WET | 0.1300000(Hectare ) | 0.1300000 |
| 2 | 18/A/1/B/3 | Private | WET | 0.1300000(Hectare ) | 0.1300000 |
| 3 | 244 P | Private | WET | 0.0600000(Hectare ) | 0.0600000 |
| 4 | 244/1/A/1 P | Private | WET | 0.1100000(Hectare ) | 0.1100000 |
| 5 | 244/1/A/1A/2 P | Private | WET | 0.0900000(Hectare ) | 0.0900000 |
| | | | Total | 0.5200 | 0.5200 |

[F. No. NHAI/BOT-I/11013/18/2006, NHAI/BOT-I/11013/20/2007/3A]

क्र. जिमाका/राअ/जाहि/२०७/२०२१-२२

RAJESH GUPTA, Director





























# स्मृती मानधनाला दुसऱ्यांदा सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची सलामीवीर फलंदाज स्मृती मानधना हिची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) वर्षातील सर्वोत्तम महिला खेळाडू (क्रिकेटर ऑफ द इयर) म्हणून निवड करण्यात आली आहे. स्मृतीला दुसऱ्यांदा हा सन्मान मिळाला आहे. यापूर्वी २०१८मध्ये तिला हा पुरस्कार मिळाला होता. पुरुष गटात या वर्षी कोणत्याही भारतीय खेळाडूला कोणत्याही प्रकारात पुरस्कार जिंकता आला नाही.

स्मृतीने गेल्या वर्षी २२ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३८.८६च्या सरासरीने ८५५ धावा केल्या होत्या. गेल्या वर्षीही तिने एक शतक आणि पाच अर्धशतके झळकावली. गेले वर्ष भारतीय संघासाठी चांगले गेले नव्हते, पण स्मृतीची बॅट तळपत होती. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत भारताने घरच्या मैदानावर आठपैकी फक्त दोनच सामने जिंकले. या दोन्ही सामन्यांत संघाच्या विजयात स्मृतीने महत्त्वाची भूमिका बजावली.






ॲड. गुरुनाथ आर. कडव (ॲडव्होकेट, हायकोर्ट)

आपणांस या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या हार्दिक शुभेच्छा!

सौजन्य : ॲड. वाय. एस. भोपी, ॲड. विकास पाटील,
ॲड. राणे, ॲड. प्रणाली सोहनी, ॲड. प्रितम वास्कर

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. भारतात सध्या एलआसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**
***अ.)*** २४ ***ब.)*** २० ***क.)*** १० ***ड.)*** २६

**२. म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन भारतात सध्या किती कंपन्या करतात?**
***अ.)*** ४० ***ब.)*** ४४ ***क.)*** २० ***ड.)*** १०

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
***अ.)*** एचडीएफसी बँक ***ब.)*** आयसीआयसीआय बँक
***क.)*** कोटक महिंद्रा बँक ***ड.)*** स्टेट बँक ऑफ इंडिया




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com